(TM)
महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
प्रकाशगड, ४था मजला, प्रा.अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व),मुंबई - ४०० ०५१ दूरध्वनी- २६४७४२११, २६४७२१३१
**Website**:www.mahadiscom.com, **E-mail** :www.msedclsalary@gmail.com

**क्र. मासं /वेतन व देयके /सण अग्रीम/** ४०४४४ **दिनांक :-** 30/11/2015

# परिपत्रक

**विषय :-** महत्वाच्या सणासाठी अग्रिम देण्याबाबत.

***************

सर्व सामान्य आदेश क्र.२६७ दि.१२.१०.१९५७ अन्वये म.रा.वि.वि.कंपनीतील कर्मचाऱ्यांना शासकीय नियमानुसार महत्वाच्या सणांसाठी अग्रिम रक्कम देण्यात येते.

या कार्यालयाचे परिपत्रक क्र.साप्रवि/वेतन व देयके/सण अग्रिम/११९/३१५४४ दि.०८.११.२०१२ अन्वये, ज्या कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन रु.१४,०७५/- पेक्षा अधिक नसेल अशा कर्मचाऱ्यांना रु.५,०००/- इतकी सण अग्रिम रक्कम देय होती. तथापि, आता महाराष्ट्र शासन, वित्त विभाग निर्णय क्रं.अग्रिम-२०१५/प्र.क्र.५७/१५/ विनियम दि.२६ ऑक्टोबर २०१५ अन्वये, सण अग्रिमासाठी मर्यादा सुधारीत करण्यात आली आहे.

प्रशासकीय परिपत्रक क्र.१ दि.२९.०९.२००५अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मा.व्यवस्थापकीय संचालक (वितरण) यांनी संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन महावितरण कंपनीतील ज्या कर्मचाऱ्यांचे मुळ वेतन रु.१७,६१५/- (रुपये सतरा हजार सहाशे पंधरा फक्त) पेक्षा जास्त नसेल अशा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय सण अग्रिम रु.१०,०००/- देण्यास मान्यता दिली आहे.

सण अग्रिम फक्त पुढील सणांना तसेच शासनाकडून वेळोवेळी घोषित करण्यात येणाऱ्या सणांसाठी अनुज्ञेय राहील.

१) दिवाळी
२) रमझान ईद
३) ख्रिसमस
४)पारसी नववर्ष
५)संवत्सरी
६) रोश-होशना
७)वैशाखी पौर्णिमा (भगवान बुद्ध जयंती)
८)स्वातंत्र्य दिन
९) प्रजासत्ताक दिन

सदर परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापासून अंमलात येईल.

सण अग्रिम मंजूर करण्यासंबधिच्या इतर अटी व शर्ती पूर्वी विहित केल्याप्रमाणे राहतील.

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(सुभाष कालेवाड)**
**महाव्यवस्थापक(मासं-मा.सं.व्य.प्र)**